# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ / आषाढ २८, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार मंत्री** | |
| **(२)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(३)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(६)** | **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(७)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

---

### खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरींना मंजूरी मिळण्याबाबत

**(१) * ६७१८४ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात रोजगार हमी योजनेंतर्गत मागील अनेक वर्षांपासून विहीरींना मंजूरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे नवीन निम्न ज्ञानगंगा प्रकल्प पूर्ण झालेला असून जलयुक्त शिवाराअंतर्गत असंख्य कामे झाली असतानाही रोजगार हमी योजनेच्या विहिरीबाबत भूजल सर्व्हेक्षण विभागाच्या जुन्याच अहवालानुसार कार्यवाही करण्यात येऊन शेतकऱ्यांना या योजनेपासून वंचित ठेवण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याच्यादृष्टीने शासनाने विहिरीचे अनुदान वाढविले असून भूजल सर्व्हेक्षणाच्या अहवालानुसार केवळ २५ गावेच विहिर खोदण्यास पात्र झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन उर्वरीत गावातील शेतकऱ्यांना विहिरींचा लाभ मिळण्यासाठी पुनर्सर्व्हेक्षण करुन शेतकऱ्यांना शासकीय योजनेतून विहिरींना मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०२१/प्र.क्र.१८२/मग्रारो-१, दिनांक ०४.११.२०२२ अन्वये मनरेगा योजने अंतर्गत सिंचन विहिरींच्या अनुदानात रु.३.०० लक्ष वरुन रु.४.०० लक्ष इतकी वाढ करण्यात आली आहे.

वरिष्ठ भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बुलढाणा यांच्या दिनांक १९.०५.२०२३ च्या पत्रानुसार खामगांव तालुक्यातील १३२ गावांपैकी २७ गावे विहिर खोदण्यास पात्र ठरविण्यात आली आहे.
भूजल मूल्यांकनानुसार भूजल वापराची टक्केवारी ६० % पेक्षा कमी आहे अशाच पाणलोटामध्ये नवीन विहिरी घेवू शकतात. गेल्या तीन वर्षापासून समाधानकारक पर्जन्यमान झाल्यानंतरही भूजल वापराची टक्केवारी ६० % पेक्षा कमी न झाल्याने नवीन विहिरीस मंजूरी देणे अनुज्ञेय नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात बियाणांच्या व खतांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(२) * ६४७३० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बियाणांच्या व खतांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतांश बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नसल्यामुळे त्यांना खाजगी सावकारांकडून कर्ज घेऊन अथवा दागिने विकून पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बियाणे व खतांच्या किंमती नियंत्रणात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) कापूस बियाणे नियंत्रण आदेश, २०१५ मधील तरतूदीनुसार बी.टी.कापूस बियाणाचे दर केंद्र शासन दरवर्षी हंगामापूर्वी अधिसूचना निर्गमित करून निश्चित करते. राज्य शासनाकडून खाजगी कंपन्यांच्या बियाणाचे दर निश्चित केले जात नाहीत. महाबीज, अकोला यांनी उत्पादित केलेल्या इतर कोणत्याही पिकांच्या बियाणांच्या दरात वाढ झाल्याचे आढळून आले नाही. तसेच, शेतकऱ्यांचा बियाणांवर होणारा खर्च कमी करण्यासाठी “घरचे सोयाबीन बियाणे वापरणे” मोहीम राबविण्यात आलेली आहे.
युरिया खताचे विक्री दर स्थिर असून युरिया वगळता इतर खतांचे अनुदान दर स्थिर आहेत. तथापि, रासायनिक खतांच्या किंमतीमध्ये कोणतीही मोठी वाढ झाल्याचे दिसून येत नाही. तसेच, खताची टंचाई टाळण्याकरीता ३४ हजार मे.टन युरिया आणि २० हजार मे.टन डिएपी संरक्षित साठा प्रत्यक्षात निर्माण करण्यात आलेला आहे. तसेच, नॅनो युरिया, नॅनो डिएपी वापरण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात लम्पी रोगाच्या प्रादुर्भावामुळे मृत झालेल्या जनावरांच्या पालकांना आर्थिक मदत न मिळाल्याबाबत

**(३) * ६५२१२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लम्पी रोगाच्या प्रादुर्भावामुळे हजारो जनावरांचा मृत्यु झालेला असून पशुधन दगावल्यास त्या पशुपालकांस शासनाकडून म्हशीला ३० हजार, बैलाला २५ हजार तर वासराला १६ हजार रुपये इतकी नुकसान भरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यात ५७१ पैकी १५८ पशुपालकांना शासनाने अद्यापही नुकसान भरपाई दिलेली नसल्याचे दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात पशुपालकास अर्थ सहाय्य मिळण्याबाबत वेळोवेळी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खामगांव यांनी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, बुलढाणा यांच्याकडे २१ पत्रांव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यात अनेक पशु पालकांना प्रशासनाच्या चुकीमुळे आर्थिक मदत मिळाली नसून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ मे, २०२३ वा त्यासुमारास जिल्हा उपायुक्त आणि प्रधान सचिव, पशुसंवर्धन यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन कार्यालयाकडे चौकशी केली असता, माहे एप्रिल पासून मयत पशुधनाच्या मदतीसंदर्भात शासनाकडून कोणतेही आदेश वा निधी उपलब्ध झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून पशुपालकांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) शासन निर्णय दिनांक १२.१०.२०२२ अन्वये राज्यात लम्पी चर्मरोग प्रादुर्भावामुळे मृत पावलेल्या प्रती गाय रु. ३० हजार, प्रती बैल रु.२५ हजार व प्रती वासरु रु.१६ हजार अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १२.१०.२०२२ अन्वये देण्यात येणारे अर्थसहाय्य हे सन २०२२-२३ साठीच लागू करण्यात आले होते. लातूर जिल्हयातील दिनांक ३१.०३.२०२३ अखेर मृत ४१४ पशुधनापैकी ३६७ मृत पशुधनाच्या पशुपालकांना अर्थसहाय्यापोटी रु.७६.३४ लक्ष निधी डिबीटीव्दारे अदा करण्यात आलेला आहे.

उर्वरित ४७ मृत पशुधनाच्या नुकसान भरपाईच्या प्रस्तावांपैकी ३३ प्रकरणे नाकारण्यात आलेली असून, १४ मृत पशुधनाच्या पशुपालकांना अर्थसहाय्य अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) खामगाव तालुक्यात दिनांक ३१.०३.२०२३ अखेर ८५० मृत पशुधनाच्या पशुपालकांचे अर्थसहाय्याचे प्रस्ताव प्राप्त झालेले असुन त्यापैकी ८३९ पशुपालकांना अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले आहे. उर्वरीत ११ पशुपालकांना अर्थसहाय अदा करावयाचे आहे.

(४), (५) व (६) चिखली (जि. बुलढाणा) तालुक्यामध्ये लम्पी चर्मरोगाच्या प्रादुर्भावाने २३५ जनावरांचा मृत्यू झालेला असुन २३२ जनावरांच्या पशुपालकांना अर्थसहाय्य अदा करण्यात आलेली असुन उर्वरित ०३ पशुपालकांना नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

या व्यतिरीक्त चिखली तालुक्यातील १८ मृत जनावरांचे नोंद न झालेले अर्थसहाय्याचे प्रस्ताव सहायक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, बुलढाणा यांच्याकडे प्रलंबित असून, पशुपालकांना अर्थसहाय्य मिळण्याकरीता सदर मृत जनावरांची नोंद तसेच पंचनामा याबाबतची पडताळणी करण्याची कार्यवाही सुरू आहे. पडताळणी अंती प्राप्त निष्कर्षाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यात गौण खनिजाचे व वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(४) * ६६३६५ श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील मांजरा नदीच्या पात्रातून परवानाधारक ठेकेदार श्री.नागमलय्या यांनी सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान ४२०० ब्रास रेतीचा परवाना असताना अतिरिक्त हजारो ब्रास रेतीची उचल केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच परभणी जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैधरित्या उत्खनन सुरु असून मागील वर्षभरात ३५० हून गौण खनिजाची वाहतुक केल्याचे निदर्शनास आले असून ५३ कोटी रुपयांचा दंड संबंधिताकडून वसूल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच औंढा (जि.हिंगोली) तालुक्यातील पूर्णा नदीपात्रात रात्रीच्या वेळी वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होत असून पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असतानाही महसूल व पोलीस विभागांकडून यासंदर्भात कोणतीच कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच गेवराई (जि. बीड) येथील गोदावरी व सिंदफणा नदीपात्रातून नंबर नसलेल्या अनेक अवजड वाहनांव्दारे अवैध वाळू वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत अनेकांनी संबंधित यंत्रणांकडे वेळोवेळी तक्रारी करुनही प्रशासन याकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष करीत असल्याने शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन अवैध गौण खनिज उत्खनन व त्याच्या होत असलेल्या वाहतूकीला आळा घालण्यासंदर्भात कार्यवाही करुन संबंधित ठेकेदार व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) गेवराई तालुक्यातील चोरटी वाळू/रेती वाहतूक करणेसाठी हायवा/टिपर वाहतूकदार हे विना नंबर प्लेट वाहने चालवित असल्याचे निदर्शनास आले परंतु उपविभागीय अधिकारी, बीड यांनी सन २०२२-२३ या कालावधीमध्ये एकूण ७८ वाहने जप्त करून रूपये २,३५,०१,५६३/- इतकी दंडात्मक कार्यवाही केली आहे. तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी माहे जानेवारी, २०२३ ते जून, २०२३ पर्यंत ९३ विना नंबर वाहनांवर कारवाई केली.

बीड जिल्ह्यात दिनांक १ एप्रिल, २०२३ ते दिनांक १५.०६.२०२३ या कालावधीत अवैध उत्खनन/वाहतुकीच्या एकूण ५० प्रकरणात रू.७८.७१ (लाखात) इतकी दंडात्मक रक्कम वसूल करून शासन जमा केली तसेच अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली ६७ वाहने व यंत्रसामग्री जप्त करण्यात आली.

-----------------

**यावल (जि.जळगाव) येथे वन परिक्षेत्रात झाडांची अवैधरित्या तोड व तस्करी होत असल्याबाबत**

**(५) * ६६१५० श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव) वनविभाग या जिल्हास्तरीय कार्यक्षेत्र असलेल्या पूर्व व पश्चिम वन परिक्षेत्रात सागवान, डिंक व इतर मौल्यवान झाडांची अवैधरीत्या तोड व तस्करी केली जात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात स्थानिक अधिकाऱ्यांच्या संगनमताने वनपरिक्षेत्रात अतिक्रमणास अवैधरित्या परवानगी दिली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) यावल पूर्व व पश्चिम वनक्षेत्रात सागवान, डिंक व इतर मौल्यवान झाडांची मोठ्या प्रमाणात अवैधरित्या तोड व तस्करी झाल्याचे आढळून आले नाही.

परंतु यावल पुर्व व पश्चिम वनपरिक्षेत्रात मागील ३ महिन्यात ४४ वृक्षांची अवैध तोड झाल्याचे आढळलेले असुन त्याबाबत २६ वनगुन्हे नोंद करण्यात आले आहेत. याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ, नागपूर, भंडारा, अमरावती व चंद्रपूर जिल्ह्यात रेतीची अवैध वाहतूक होत असल्याबाबत**

**(६) * ६५५९६ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात अद्याप रेती घाटांचे लिलाव झाले नसल्यामुळे रेती तस्करांनी चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना येथे रेती उत्खननाचा आधार घेऊन माहूर तालुक्यातील पैनगंगा नदीपात्रातून उत्खनन करुन रेती यवतमाळ जिल्ह्यात विक्रीसाठी नेल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान पुसद येथील वसंतनगर पोलिसांच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच नागपूर व भंडारा जिल्ह्यातील रेती घाट बंद असल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातून रेती नागपूर येथे आणण्यासाठी काम्पा ते भिसी या मार्गावरून अवैधपणे रात्रीच्या सुमारास रेतीची वाहतूक होत असल्याचेही माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी, सिंदेवाही तालुक्यातील नद्यांमधून रेती उपशाची मुदत संपली असतानाही महसूल प्रशासनाच्या स्थानिक यंत्रणेशी संगनमत करुन बेकायदेशीर रेती उपसा सुरु असून ब्रम्हपूरी ते नागपूर या १५० किमी मार्गावर ८ पोलीस स्टेशन व एलसीबीचेही पथक असून देखील या मार्गावरुन अवैध रेतीची वाहतूक होत असल्याचेही माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अवैध अवजड वाहनातून केल्या जाणाऱ्या रेती वाहतूकीमुळे गावातील रस्त्यांची दुरवस्था होऊन धुळीमुळे शेत पिके खराब होणे, नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे तसेच वाहतूकीदरम्यान अपघात होत असून शासनाचा महसूल देखील बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच धामणगांव रेल्वे (जि. अमरावती) तालुका रेतीच्या माध्यमातून शासनाला सर्वात जास्त महसूल देणारा तालुका म्हणुन ओळखला जातो, मात्र येथील घाटांत रेती चोरीच्या माध्यमातून पडलेल्या खड्डयांमुळे रेती घाटाचे लिलाव होत नसल्याने दोन कोटी रुपयांचे रेतीघाट तस्करांच्या ताब्यात आल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन अवैध रेती उत्खनन व वाहतूक रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषीवंर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) पोलीस स्टेशन, वसंतनगर, ता.पुसद यांनी केलेल्या कार्यवाहीमध्ये अवैध रेतीची वाहतूक करताना आढळून आलेली दोन वाहने पकडलेली असून तहसिलदार, पुसद यांनी एका वाहनावर कारवाई करून रू.०१,४३,४४०/- एवढ्या रकमेची दंडात्मक रक्कम शासन जमा केली असून, दुसऱ्या वाहनावर आकारण्यात आलेल्या रू.१७,८१,०४०/- रकमेच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) अमरावती जिल्ह्यात सन २०२१-२०२२ मधील रेतीघाट लिलावमध्ये धामणगाव रेल्वे तालुक्यातील ३ रेती घाटाचे लिलाव यशस्वी होऊन रू.०२,७४,१९,२००/- एवढा महसूल शासनास प्राप्त झाला. तसेच तालुक्यातील रेतीघाट तस्करांच्या ताब्यात असल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(६) अमरावती व नागपूर विभागातील जिल्ह्यात गौण खनिजाची अवैध वाहतूक/उत्खनन रोखण्यासाठी जिल्हास्तरीय भरारी पथके स्थापन करून जिल्ह्यातील रेतीघाटाची तपासणी करण्यात येते. अशी अवैध प्रकरणे आढळून आल्यास त्यानुषंगाने दंडात्मक कारवाई करण्यात येते.

-----------------

## राज्यात गृहनिर्माण संस्थांच्या भूखंड व चटई क्षेत्राचा लाभ हस्तांतरित करण्याबाबत

**(७) * ६५१०४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली),**

**श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रलंबित असलेल्या मानीव अभिहस्तांतरणाची (डिम्ड कन्व्हेन्स) कार्यवाही जलदगतीने होण्याकरिता महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट अँक्ट (मोफा) कायदा रद्द करुन भूखंड व चटई क्षेत्रफळाबाबतचे विकासकांचे हक्क अबाधीत राखून सहकारी गृहनिर्माण संस्थांना तात्पुरता मालकी हक्क बहाल करण्याचा निर्णय दिनांक २२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओनरशिप फ्लॅट अँक्ट आणि मानीव अभिहस्तांतरण कायदा ह्या दोन्ही बाबी भिन्न असून शासनाने राज्यातील ग्राहक जनतेचे संरक्षण करणारा मोफा कायदा रद्द करण्याची तसेच संस्थांचा भूखंड व कोट्यवधी रुपये किंमतीच्या मालकीचे चटई क्षेत्रफळ विकासकास बहाल करण्याकरिता राखीव ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त कायद्यातील विकासकधार्जीण्या बदलास मुंबईतील भाडेकरु संघ महामंडळाचे सचिव तसेच कार्याध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत या संघटनांनी तीव्र विरोध केला असून याबाबत मुंबईसह राज्यातील सुमारे ७१ हजार ४४४ अभिहस्तांतरणाच्या प्रतिक्षेत असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या प्रतिनिधींनी तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी संस्थेच्या मालकीचा भूखंड व चटई क्षेत्राचा लाभ संस्थेस हस्तांतरीत करुन जलदगतीने गृहनिर्माण संस्थांना मानीव अभिहस्तांतरण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ दिनांक २३.०६.२०१६ रोजी अधिसूचित केला. त्यानुषंगाने राज्यात दिनांक ०१.०५.२०१७ पासून सदर अधिनियम लागू केला आहे. महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, १९६३ अधिनियमातील तरतूदी या आता लागू करण्यात आलेल्या स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतूदींशी मिळत्याजुळत्या आहे. राज्यामध्ये स्थावर संपदा क्षेत्रातील होणाऱ्या व्यवहारांचे नियमन करण्याच्या प्रयोजनाकरिता दोन वेगवेगळे अधिनियम अस्तित्वात आहेत. स्थावर संपदा क्षेत्रातील व्यवहारांचे नियमनाच्या कामकाजामध्ये एकसुत्रता निर्माण करून प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने, मोफा अधिनियम, १९६३ निरसित करणे उचित होईल किंवा कसे तसेच, मोफा अधिनियम निरसित न करता त्यामध्ये अन्य तरतूदींची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग व विधी व न्यायविभाग यांच्याशी विचारविनिमय सुरू आहे.
(४) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मानीव अभिहस्तांतरणाच्या प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यासाठी सहकर पणन व वस्त्रोद्योग विभागाने शासन निर्णय दिनांक २२.०६.२०१८ अन्वये कार्यपध्दती निश्चित केली आहे. त्याच प्रमाणे शासन निर्णय दिनांक ३१.०५.२०२३ अन्वये स्वयंपुनर्विकास करण्याचा निर्णय घेणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थानी मानीव अभिहस्तांतरणाचा प्रस्ताव सादर केल्यास, सक्षम प्राधिकाऱ्याकडून सदर प्रस्तावावर नमुना क्र. १० ची नोटीस दिल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या कालावधीत निर्णय घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोईसर व पालघर (जि. पालघर) येथे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाकरिता खोदण्यात आलेल्या खाणीत पडून दोन युवकांचा झालेला मृत्यू**

**(८) * ६६६७० श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे कामासाठी बोईसर-चिल्हार मार्गावरील खुटल येथे गौण खनिजासाठी खोदण्यात आलेली खाण सध्या वापरात नसून सदरहू उघड्या खाणीत पोहायला गेलेल्या कु.रोहन प्रदीप कवटे या १५ वर्षीय विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू झाल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर (जि.पालघर) तालुक्याच्या मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गाच्या भरावासाठी पूर्वेकडील बोर शेती गावातील नागझरी- बऱ्हाणपूर रस्त्यावरील माती मुरुमासाठी खोदलेल्या खड्ड्यात बोरशेती गावातील १७ वर्षीय दीप सुनील शेलार या युवकाचा बुडून मृत्यू झाल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून या प्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठेकेदार कंपनीने दगड उत्खनन करण्यासाठी उच्च क्षमतेचे सुरुंग स्फोट केल्याने परिसरातील घराच्या भितींनाही तडे जाऊन नुकसान होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन या ठिकाणी सुरक्षात्मक उपाययोजना करण्याबाबत, मृतांना आर्थिक मदत देण्यास व संबंधित ठेकेदारांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे खुटल येथे गौणखनिजासाठी खोदण्यात आलेल्या खाणीत दिनांक १६.०४.२०२३ रोजी १५ वर्षीय विद्यार्थ्याचा पडून मृत्यू झाला आहे. त्यानुषंगाने सदर विद्यार्थ्याच्या कुटुंबास प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, पालघर यांच्या दिनांक ०३.०७.२०२३ च्या आदेशान्वये रू.२,००,०००/- सानुग्रह अनुदान मंजुर करण्यात आले आहे.

मौजे बोरशेती येथील गट क्र.१९६ मधील गौणखनिज उत्खननाच्या खाणीमध्ये एक १७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. त्यानुषंगाने खाणकाम केलेल्या कंपनीकडून मृत व्यक्तीच्या कुटुंबियास रू.१५,००,०००/- एवढी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

भूसुरूंग स्फोटामुळे नजीकच्या रहिवाशांच्या घरांना तडे जाऊन घराचे नुकसान होत असलेबाबतची बातमी न्युज १८ लोकमत वाहिनी तसेच पुढारी या वृत्तपत्रात दिनांक ३१.०१.२०२३ रोजी प्रसिध्द झाली. त्यानुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये मौजे बोरशेती व मौजे किराट (गेटीचापाडा) येथील रहिवाशांच्या घराला तडे गेले असल्याचे दिसून आले असून, सदर २७ घरांची दुरूस्ती करून देण्याबाबत व मर्यादाप्रमाणेच ब्लास्टींग करणे आणि त्यासाठी दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याच्या सूचना संबंधीत कंपनीस जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून देण्यात आल्या आहेत.

-----------------

**कांदिवली चारकोप (पश्चिम) व वडाळा (पूर्व) येथे कांदळवनाची तोड करुन बांधकाम होत असल्याबाबत**

**(९) * ६५८३३ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड**

**पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली चारकोप पश्चिम (मुंबई) खाडीजवळ कांदळवनाची कत्तल करुन भूमाफियांकडून अनधिकृत व्यावसायिक गाळे व चाळींचे बांधकाम सुरु असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तसेच पोलीस विभाग महाराष्ट्र सागरी नियंत्रण व्यवस्थापन यांच्याकडेही तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबई (वडाळा, पूर्व) येथील भारतीय कमला नगरजवळ कांदळवनावर अतिक्रमण करण्यात येत असून खाडीलगत असणाऱ्या तिवरांच्या झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल करुन भूमाफियांनी अनधिकृत झोपडपट्ट्या उभ्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी करुन कांदळवनाचे संरक्षण करण्यासंदर्भात तसेच भूमाफियांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) मौजे चारकोप ता. बोरीवली येथील कांदळवनापासून ५० मी. च्या आत जागेवर अनधिकृत झोपड्या बांधणाऱ्या व्यक्तींविरुध्द चारकोप पोलिस ठाणे येथे गु.र.क्र.१६१/२०२३, कलम ४४१, ४४७,३४ भा.द.वि.सह कलम १२० महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ सह कलम - ५० महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ तसेच वि.स्था.गु.नों.क्र.२५९/२०२३ व २६०/२०२३, कलम १५(१)(२) पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मौजे वडाळा, मुंबई येथे कांदळवन क्षेत्रात माती भराव करण्यात आल्यामूळे श्री. मुरारीलाल गारोडीया यांच्या विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### खेड (जि.रत्नागिरी) तसेच मालवण (जि. सिंधुदूर्ग) तालुक्यात मोठ्या प्रमाणात नियमबाह्य वाळू उत्खनन व वाहतूक होत असल्याबाबत

**(१०) * ६६४७० श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीपट्टा भागातील बहिरवली, वशिष्ठी व दाभोळ या खाडीमध्ये गत एक वर्षापासून बेकायदेशीररित्या वाळूमाफियांकडून वाळू उत्खनन व वाहतूक होत असून यावर स्थानिक प्रशासनाद्वारे कोणतीही कारवाई केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वाळू माफियांकडून दररोज सुमारे २०० ब्रास वाळू उत्खनन होत असून याबाबत स्थानिकांनी तहसीलदार, खेड व जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे तक्रारी केल्यानंतरही स्थानिक प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच मालवण (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील कालावल खाडी पात्रात वाळू उत्खनन परवाना क्षेत्राबाहेर नियमबाह्य पद्धतीने दिवस रात्र वाळू उत्खनन होत असल्यामुळे त्या परिसरातील खोत जुवा बेट व आजूबाजूच्या परिसरातील खाडी पात्र विस्तारामुळे धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू वाळू उत्खननास कायमस्वरूपी बंदी आणून त्यास परवानगी देण्यात येऊ नये अशी तेथील ग्रामस्थांनी मागील सुमारे दोन वर्षांपासून सातत्याने तहसीलदार, मालवण, जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग तसेच पालकमंत्री, सिंधुदूर्ग जिल्हा यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) खोत जुवा ग्रामस्थ यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने कालावल खाडी पात्रात अनधिकृत वाळू उत्खननासाठी उभारलेले रॅम्प जे.सी.बी. च्या सहाय्याने नष्ट करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत खोत जुवा बेटाच्या दोन्ही बाजूस अनधिकृत वाळू उत्खननास आळा घालण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांचेमार्फत नियमित पाहणी केली जाते.

समुद्रास येणाऱ्या भरती-ओहोटी व पावसाळयात येणाऱ्या पुरामुळे खाडीपात्राचा विस्तार होऊन खोत जुवा परिसराला धोका निर्माण झाला असल्याने पतन विभागामार्फत मसुरकर खोत जुवा, ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग येथे धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याचे काम मंजूर असून सद्य:स्थितीमध्ये काम प्रगतीत आहे.

(५) व (६) रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

रत्नागिरी जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२२ ते माहे जून, २०२३ या कालावधीत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी ७२ प्रकरणामध्ये ६३.०८ लक्ष इतका दंड आकारण्यात आला आहे.

सिंधुदूर्ग जिल्ह्यात एप्रिल, २०२२ ते जून, २०२३ या कालावधीत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी २६१ प्रकरणामध्ये कारवाई करुन रु. ३७,८५,३१,३१६ /- इतका दंड आकारण्यात आला आहे.

-----------------

## आरवली ते तळेकाटे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे दगडाचे डोंगर फोडण्यासाठी होत असलेला ब्लास्टिंगचा वापर थांबविण्याबाबत

**(११)** * **६६९१२ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई- गोवा या राष्ट्रीय महामार्गावर आरवली ते तळेकाटे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या भागातील कुरधुंडा या ठिकाणी ठेकेदार श्री.म्हात्रे यांच्यामार्फत दगडाचे डोंगर फोडण्यासाठी बेकायदेशीरपणे दिवस रात्र ब्लास्टिंगचा वापर करण्यात येत असून, हे ब्लास्टिंग २५० फुटापेक्षा जास्त असल्याने संपूर्ण गावाला हादरे बसून घरे व अन्य इमारती कमकुवत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ब्लास्टिंग विरोधात आंदोलन करुन ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी व पालकमंत्री, रत्नागिरी यांची माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान भेट घेऊन कंपनी विरोधात गुन्हा दाखल करण्यासंदर्भात लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संबंधित कंपनीला ग्रामपंचायतीने तीन नोटीस देऊन तसेच राष्ट्रीय महामार्ग अभियंता, साखरपा विभाग यांनीही नोटीस बजावून तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी या भागामध्ये ब्लास्टिंग न करण्याचे लेखी आदेश काढून सुद्धा कंपनीचा मनमानी कारभार सुरूच आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ब्लास्टिंग थांबविणेबाबत कार्यवाही करुन संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) तहसीलदार, संगमेश्वर, गटविकास अधिकारी, संगमेश्वर व उपअभियंता, राज्य महामार्ग, साखरपा यांनी मौजे कुरधुंडा खुर्द या गावातील घराची पाहणी केली असता १४ घरांना अंशत: तडे गेले असल्याचे निदर्शनास आले आहे परंतु सदर तडे कशामुळे गेले आहेत याची शहानिशा करण्याबाबत अप्पर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कार्यकारी अभियंता, उत्तर रत्नागिरी, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांना सूचना दिल्या आहेत.

ग्रामपंचायत कुरूधुंडा यांनी दिनांक २१.०३.२०२३ व २८.०३.२०२३ तर कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग रत्नागिरी विभाग, रत्नागिरी यांनी दिनांक ०९.१२.२०२२ रोजी संबंधित कंपनीस ब्लास्टिंग न करण्याच्या नोटीस बजाविण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक एम.एच. ६६ च्या कामी नेमलेल्या संबंधित कंपनीकडून कुरधुंडा येथील रहिवासी हद्दीमध्ये बेकायदेशीपणे बोर ब्लास्टिंग केल्यामुळे घरे व निवासी इमारतींना हादरे बसत व तडे जात असल्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी ग्रामस्थ, संबंधित ठेकेदार यांनी बैठक घेण्यात येऊन दिनांक २७.०४.२०२३ च्या पत्रान्वये कंपनीस सूचना दिल्या आहेत.

-----------------

## राज्यात पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या लाभापासून अनेक शेतकरी वंचित असल्याबाबत

**(१२) * ६४६३४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.शिरीष चौधरी (रावेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना तीन टप्प्यात सहा हजार रुपये देण्याची तरतूद असताना राज्यातील ११ लाख अपात्र शेतकऱ्यांच्या खात्यात १५५४ कोटी रुपये जमा करण्यात आल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी गोंदिया जिल्ह्यात झालेल्या तक्रारींनुसार केंद्र शासनाने लाभार्थी पडताळणीचे आदेश दिल्यानंतर ५ हजार ६४५ शेतकऱ्यांना अपात्र ठरविण्यात आल्याचे व त्यात दीड हजार लाभार्थ्यांची जमीनच नसल्याचेही दिनांक २० मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच जळगांव जिल्ह्यात पंतप्रधान सन्मान योजनेचा लाभ घेण्यासाठी अद्यापही ३३ हजार २३ शेतकऱ्यांचे बँक खाते आधार लिकींग झाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अपात्र शेतकऱ्यांच्या खात्यावरील रक्कम वसूल करण्याचे आदेश कृषी विभागाला देण्यात आले आहेत तसेच ज्या अपात्र शेतकऱ्यांनी रक्कम काढून घेतली आहे, त्यांच्या सातबारा उताऱ्यावर थकबाकीची नोंद करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना ई-केवायसी तसेच बँक खाते आधार लिंक करणे बंधनकारक असताना त्याची पूर्तता करुन न शकल्यामुळे लाखो शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, डाटा अपडेट, ई-केवायसी, स्वयंनोंदणी मान्यता व आधार लिंकींग इ. अनेक पूर्ततेमध्ये शेतकऱ्यांना अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेच्या अंमलबजावणीतील तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करुन पात्र लाभार्थ्यांना तात्काळ योजनेचा लाभ देण्यासंदर्भात तसेच या प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थींच्या बॅंक खात्यात तीन समान हप्त्यात वार्षिक रक्कम रु.६०००/- थेट हस्तांतरणाद्वारे अदा करण्यात येते.

पी. एम. किसान योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमधील अपात्रतेच्या निकषांनुसार राज्यात सद्यस्थितीत एकूण १४.२८ लाख अपात्र ठरलेल्या लाभार्थींकडून रक्कम रू.१७५४.५० कोटी रक्कम वसुलपात्र आहे. सदरचा लाभ परतावा वसूल करण्याची कार्यवाही सुरु असून दिनांक ०७.०७.२०२३ अखेर एकूण १.०४ लाख लाभार्थींकडून रक्कम रू.९३.२१ कोटी वसूल करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे राज्यात यादृच्छिक पध्दतीने ५ टक्के व १० टक्के लाभार्थींची भौतिक तपासणी करण्यात येत आहे. त्यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील २७५९९ लाभार्थींपैकी १५,२५९ लाभार्थींची भौतिक तपासणी केल्यावर एकूण १,४४८ लाभार्थी अपात्र ठरले आहेत. उर्वरीत १२,३४० लाभार्थींची भौतिक तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

गोंदिया जिल्ह्यात एकुण २,७४,८८५ नोंदणीकृत लाभार्थींपैकी सद्य:स्थितीत एकूण पात्र लाभार्थी २,३२,४६८ आहेत. आयकर भरणा करणारे व इतर कारणांने अपात्र ठरलेले लाभार्थी एकूण ११,८८७ लाभार्थी आहेत.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

पी.एम.किसान योजनेचा लाभ मिळणेसाठी राज्यातील पात्र लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करणे केंद्र शासनाने बंधनकारक केले आहे.

त्यानुसार जळगांव जिल्ह्यातील एकूण ४,१४,८०३ पात्र लाभार्थींपैकी एकूण ३,८६,८५६ लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करण्यात आली असून उर्वरीत एकूण २७,३९५ लाख लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) नाही, हे खरे नाही.

पी.एम.किसान योजनेअंतर्गत अपात्र लाभार्थींना अदा झालेल्या लाभ परताव्याची महसूल विभागाकडून नियमोचित वसूली करण्यात येत आहे.

(५) होय, खरे आहे.

केंद्र शासनाने पी.एम.किसान योजनेच्या पात्र लाभार्थींची भूमी अभिलेख नोंदीप्रमाणे पोर्टलवर माहिती अद्ययावत करणे, ई-केवायसी प्रमाणिकरण व बँक खाती आधार संलग्न करणे याबाबी बंधनकारक केलेल्या आहेत. या तिनही बाबींची पूर्तता केलेले एकूण ७६.५५ लाख लाभार्थी १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी पात्र ठरत आहेत. तथापि केंद्र शासनाने बंधनकारक केलेली ई-केवायसी प्रमाणिकरणाची बाब शिथिल केली असल्याने सद्य:स्थितीत राज्यातील एकूण ८५.०१ लाख पात्र लाभार्थींना १४ व्या हप्त्याचा लाभ अदा होईल.

राज्यात ई-केवायसी प्रमाणिकरण, भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत करणे व बँक खाती आधार संलग्न करणे तसेच प्रलंबित लाभार्थींची कार्यपूर्तता करणेसाठी सामाईक सुविधा केंद्र (CSC) व इंडिया पोस्टल पेमेंट्स बँक (IPPB) यांचे सहकार्याने गावपातळीवरील कॅम्प आयोजित करण्यात आले आहेत. सदर कॅम्पमध्ये प्रलंबित लाभार्थींची कार्यपूर्तता करण्यात येत आहे.

(६) व (७) होय, हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने लाभार्थींना ई-केवायसी साठी मोबाईल आधारे, सामाईक सुविधा केंद्रामार्फत व PM KISAN GoI ॲपद्वारे सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. तसेच बँक खाते IPPB मध्ये उघडून आधार संलग्न करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. त्याआधारे गावपातळीवरील मोहिमेमध्ये ई-केवायसी व बँक खाती आधार संलग्न करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासनाने शासन निर्णय क्र. किसयो - २०२३/प्र.क्र.४२/११-अे दिनांक १५ जून, २०२३ योजनेच्या प्रशासकीय कार्यपध्दतीमध्ये बदल केलेला असून महसूल व कृषि विभागास योजनेचे कामकाज विभागून दिले आहे. तसेच पी.एम.किसान योजनेशी संबंधित प्रलंबित कामकाजाची तात्काळ कार्यपूर्तता करणेबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील गायरान जमिनीवरील लाभार्थ्यांना त्यांच्या हक्कांची घरे कायमस्वरुपी मिळण्याबाबत**

**(१३) * ६४६८९ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गायरान जमिनीवरील घरकुलधारकांना अतिक्रमण केल्याचे ठरविण्यात येऊन संबंधित तहसीलदारांकडून नोटिसा पाठविण्यात आल्या असून एका महिन्यात कागदपत्रे आणि म्हणणे सादर करण्याचे आदेश माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात "गायरान जमिनींवरील भूमिहीन, अनुसूचित जाती जमातीतील घटकांची घरकुले हटवू नयेत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या असून सरकार न्यायालयात भूमिका मांडेल", असे आश्वासन महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भूमिहीनांची अतिक्रमणे न्यायालयीन आदेशातून वगळण्याची विनंती करणारी पुनर्विचार याचिका सरकारने तात्काळ दाखल करावी अशी मागणी विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांनी त्यांच्या दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन घरकुलधारकांना दिलासा देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग दिनांक १६.०२.२०१८ व दिनांक २२.०८.२०२२ तसेच, शासन निर्णय, नगर विकास विभाग दिनांक १७.११.२०१८ मधील तरतुदीनुसार पात्र असलेली अथवा शासनाच्या यापूर्वीच्या इतर कोणत्याही धोरणांनुसार / तरतुदीनुसार संरक्षित असलेली अतिक्रमणे कार्यवाहीतून वगळण्यात यावीत, अशी भूमिका मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राव्दारे मांडण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या नवीन वाळू धोरणाच्या अंमलबजावणीबाबत

**(१४) * ६४९९१ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने वाळू उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे नव्या दरानुसार विक्रीच्या नव्या सर्वकष वाळू धोरणाची दिनांक १ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारापासून राज्यात अंमलबजावणी सुरु केलेली असून सर्वसामान्य नागरिकांना ६०० रुपये प्रति ब्रास याप्रमाणे वाळू पुरवठा करण्याची तरतूद केली असली तरी या निर्णयातील अनेक त्रुटींमुळे सर्वसामान्यांना वाळू उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धोरणामध्ये बांधकाम व्यवसायिकांना वाळू देण्याबाबत तरतूद करण्यात आलेली नाही तथापि बांधकाम व्यावसायिकांना स्वस्त वाळू उपलब्ध करून दिल्यास बांधकामाच्या व घरांच्या किंमती कमी करण्याचे प्रतिज्ञापत्र घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन वाळू धोरणानंतर राज्यातील वाळूचे लिलाव बंद करण्यात आले असतानाही राज्यात मोठ्या प्रमाणात नदीपात्रातील वाळू ट्रॅक्टरच्या माध्यमातून अवैधरीत्या उपसा करून वाळू माफिया चढ्या दरात विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवीन वाळू धोरणाची अद्यापही अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे ऑनलाईन पद्धतीने वाळू खरेदीसाठी व्यापाऱ्यांना अजूनही प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील वाळूची मागणी वाढण्याची शक्यता गृहीत धरून महसूल प्रशासनाने विविध नदीपात्रांमधून वाळू एकत्र आणण्याचे काम सुरू केले असल्याचे दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील नागरीक व विकासकांना सहज, सुलभतेने, स्वस्त वाळू देण्याचे धोरण यशस्वीरित्या राबविण्याकरिता तसेच वाळू माफियांना रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) राज्यातील नागरिकांना बांधकाम योग्य वाळू स्वस्त दराने उपलब्ध करुन देणे तसेच अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व विक्री व्यवस्थापन करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर १ वर्षासाठी दिनांक १९/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारित वाळू धोरण निर्गमित केले आहे.

सुधारित वाळू धोरणानुसार दिनांक १० जून ते ३० सप्टेंबर या पावसाळ्याच्या कालावधीत वाळू उत्खनन करण्यास बंदी आहे. त्यामुळे नदीपात्रातून वाळू उत्खनन करुन जास्तीत जास्त डेपो निर्मिती व्हावी या उद्देशाने निविदा प्रक्रिया राबविण्याचा कालावधी १५ दिवसावरुन ७ दिवस करण्यात आला. त्यानुसार दिनांक ३०/०६/२०२३ पर्यंत राज्यात एकूण १५ जिल्ह्यात ५६ वाळू डेपोची निर्मिती करण्यात आली आहे. सदर वाळू डेपोमधून २६,९४२ नागरिकांना १,६१,२८५.३ ब्रास वाळू दिनांक ०६/०७/२०२३ पर्यंत उपलब्ध करुन दिली आहे.

उर्वरित जिल्ह्यामध्ये काढण्यात आलेल्या निविदेला/फेर निविदेलादेखील प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे राज्यात सर्व ठिकाणी अपेक्षित वाळू साठा करणे शक्य झाले नाही.

जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी गस्ती पथके, स्थिर पथके तसेच, महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

राज्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी माहे एप्रिल, २०२३ ते मे, २०२३ या कालावधीत एकूण १७०५ प्रकरणात रु.२८४७.९६/- लाख इतक्या दंडाची आकरणी करण्यात येवून १७८ गुन्हे दाखल केले आहेत.

-----------------

## उरण (जि.रायगड) परिसरातील खाडी किनारी अनधिकृतपणे होत असलेल्या मातीच्या भरावामुळे नैसर्गिक नाले व शेती नष्ट होत असल्याबाबत

**(१५) * ६४६७५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) परिसरातील खाडी किनारी विकासकांमार्फत अनधिकृतपणे होत असलेल्या मातीच्या भरावामुळे नैसर्गिक नाले व शेती नष्ट होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाडी किनारी होत असलेल्या मातीच्या भरावामुळे पाण्याचा निचरा होत नसून उक्त परिसरातील गावांमध्ये पुरसदृष्य स्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांच्या भात पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने उक्त परिसरातील अनधिकृत मातीचा भराव करणाऱ्या विकासकांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:** (१), (२), (३) व (४) उरण तालुक्यातील जासई व पनवेल तालुक्यातील बेलपाडा या गावाच्या हद्दीला लागून असलेल्या खाडी जवळील मौजे जासई येथील स.नं. ४०, ४९, ५० व ५१ या खाजगी मालकीच्या जमिनीवर अंदाजे २५०० ते ३००० ब्रास डेब्रिजचा भराव केला असल्याचे निर्दशनास आलेले आहे. परंतु, नैसर्गिक नाले व शेती नष्ट झाल्याचे प्रथम दर्शनी निर्दशनास आलेले नाही.

उरण तालुक्यातील मौजे वालटीखार येथील सिडकोच्या मालकीच्या स.नं. १७ व १९ या जमिनीवर अंदाजे ३००० ते ४००० ब्रास डेब्रिज भरावामुळे कांदळवनाच्या नुकसानीच्या अनुषंगाने उरण पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र. ०२७६/२०२२ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम १५ व १९ अन्वये ०८ व्यक्तीविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत. सदर डेब्रिजच्या भरावामुळे भात पिकाचे नुकसान होत असल्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना निवेदन/तक्रार प्राप्त झालेली नाही.

-----------------

## इतर मागास बहुजन विभागामार्फत उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(१६) * ६४५८२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती श्वेता महाले**

**(चिखली), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सन २०१८ पासून विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ पासून शिष्यवृत्ती मंजूर असतानाही अद्यापपर्यंत विद्यार्थ्यांना ती मिळाली नसल्याने अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणीत येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS आणि THE यांच्या सरासरी २०० च्या आतील जागतिक रँकिंग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेत गुणवत्तेच्या आधारावर या प्रर्वगातील ५० विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी ही शिष्यवृत्ती दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने सन २०२२ मध्ये शासन निर्णय निर्गमित करुन उपरोक्त प्रवर्गातील ५० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार विद्यार्थी परदेशातील शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेवून परदेशात रवाना झाले, तसेच त्यांचे शिक्षणही सुरु झाले, परंतु अद्यापही शासनाने शिष्यवृत्ती सुरु न केल्यामुळे अनेक विद्यार्थी व पालक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिष्यवृतीसाठी निवड झालेल्या परदेशात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना तात्काळ शिष्यवृत्ती देण्याबाबत तसेच सदरहू शिष्यवृत्तीची योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गतच्या टॅब खरेदीच्या निविदेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) * ६४७६६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रोजगार हमी योजना विभागाशी संलग्न असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत २६ हजार २५० टॅब खरेदीच्या निविदेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सचिवांना १ ते ५ कोटी रुपयांच्या आर्थिक मर्यादेत निविदा काढण्याचे अधिकार असतानाही संबंधित खात्याच्या तत्कालीन सचिवांनी उक्त टॅब खरेदीसाठी ७० कोटी रुपयांची खरेदी निविदा काढून अकरा

दिवसात एका विशिष्ट कंपनीलाच प्राधान्य देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार ५ कोटींपेक्षा जास्त रकमेच्या निविदा काढण्यासाठी व टॅब खरेदीसाठी उच्चाधिकार समितीची परवानगी घेणे आवश्यक असताना ती घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निविदेमध्ये टॅब जीआयएस मोबाईल ॲप्लीकेशनचा समावेश असावा अशी अट नमूद असून केंद्र शासनाने हे मोबाईल ॲप्लीकेशन मोफत उपलब्ध करून दिलेले असतानाही यासाठी रुपये ३५ कोटीचा खर्च करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, रायगडसह कोकणातील अनेक ग्रामपंचायतींचे रोजगार हमी योजनेंतर्गतचे कुशल कामाचे अनुदान प्रलंबित असताना अद्यापही त्याचे अनुदान अदा केले जात नसताना ही खरेदी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणांची चौकशी विशेष तपास पथकाकडून करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.
सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून कुशल खर्चाचा निधी उशीराने प्राप्त झाल्यामुळे (दिनांक २६ जून, २०२३) रायगड जिल्ह्यातील कुशल कामाची देयके अनुदान अभावी प्रलंबित होती.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुंज (ता.वाडा, जि.पालघर) गावाच्या हद्दीतील अनेक दगडखाणींमुळे भातशेतीचे नुकसान होत असल्याबाबत

**(१८) * ६७१३२ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंज (ता.वाडा, जि.पालघर) गावाच्या हद्दीतील अनेक दगडखाणीमधून माती व दगड आदी गौण खनिजाचे अनधिकृतपणे बेसुमार उत्खनन व वाहतूक होत असल्याने गावातील रजना हरड तसेच अन्य ग्रामस्थांच्या घरांचे व भातशेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मौजे किराट (ता.बोईसर, जि.पालघर) येथील दगड खाणीत करण्यात येणाऱ्या भूसुरुंग स्फोटामुळे मुंदले नागझरी व लोलांडे या आदिवासी पाडयांतील नागरिकांच्या घरांना तडे जाऊन राहण्यासाठी घरे धोकादायक बनली असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अनधिकृत दगडखाणी कायमस्वरूपी बंद करण्याबाबत तसेच विनाविलंब नुकसान भरपाई मिळण्याबाबत सदरहू गावातील ग्रामस्थांनी गत एक वर्षापासून तहसीलदार, वाडा, जिल्हाधिकारी, पालघर आदिकडे प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन अनधिकृत दगडखाणी विरोधात विनाविलंब ठोस कारवाई करून या खाणी कायमस्वरूपी बंद होण्याच्या दृष्टीने तसेच आतापर्यंत या दगडखाणी विरोधात कोणतीही कारवाई न करणाऱ्या संबंधीतावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे गुंज ता. वाडा, जि. पालघर गट नं. ४२ अ, ४२ब, ४७, ४३, ३० व २९ या जमिनीच्या बाजूला असणाऱ्या खदाण व क्रशर मधून निघालेली माती व दगड वाहत येवून शेती नापिक होत असल्याबाबत तहसिलदार, वाडा यांच्याकडे तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता खदाण व क्रशर मालक यांनी तक्रारदार यांच्या शेतात वाहून आलेली माती व दगड काढून शेती पुर्ववत करून दिलेली आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी केलेली तक्रार मागे घेत असल्याचे मंडळ अधिकारी यांच्या समक्ष जबाब दिलेला आहे.

मौजे किराट (ता.पालघर) येथील दगड खाणीत करण्यात येणाऱ्या भूसुरुंग स्फोटामुळे नागझरी, लोलांडे या अदिवासी पाडयातील नागरीकांच्या घरांना तडे जाऊन राहण्यासाठी घरे धोकादायक बनली असल्याचे माहे जून, २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही. तसेच दगडखाण कायमस्वरूपी बंद करण्याबाबत आणि विनाविलंब नुकसान भरपाई मिळण्याबाबत तहसिलदार, वाडा व जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे निवेदन प्राप्त झालेले नाही.

-----------------

**राज्यात शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहिल्याने विमा कंपनीच्या विरोधात कारवाई करण्याबाबत**

**(१९) * ६५१८८ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यानंतर त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी सुरु केलेल्या पंतप्रधान पिकविमा योजनेंतर्गत केवळ एक रुपया भरुन विम्याचा लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अतिवृष्टीमुळे लाखो शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असतानाही विमा कंपनीच्या त्रुटी, हलगर्जीपणा तसेच दुजाभाव यास्तव अनेक शेतकरी विम्यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपनीच्या नियमानुसार नुकसान झाल्यापासून ७२ तासाच्या आत शेतकऱ्यांनी कंपनीला तक्रार करुनही अनेक ठिकाणी पिकांचे पंचनामे करण्यात आले नसून काही ठिकाणी शाळेतील विद्यार्थ्यांना पंचनाम्याकरिता नियुक्त करुन सदोष पंचनामे करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती, अकोला येथे विमा कंपनीच्या प्रतिनिधींच्या विरोधात गुन्हे देखील नोंदविण्यात आले असून राज्यात अनेक ठिकाणी पंचनाम्यात देखील मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी केल्या आहेत तसेच गेवराई व वडवणी (जि.बीड) येथे शेतकऱ्यांना २०२० चा खरीप पिक विमा ३० दिवसांच्या आत भारतीय कृषी विमा कंपनीने द्यावा असे आदेश दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास राज्य तक्रार निवारण समितीने दिला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मा.सर्वोच्च व उच्च न्यायालयाने शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल देत नुकसान भरपाई देण्याचे आदेश विमा कंपन्यांना दिले असतानाही त्याची अंमलबजावणी राज्यात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, अनेक शेतकऱ्यांना सन २०२० ते २०२२ पर्यंतची नुकसान भरपाईची रक्कम अद्याप मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, सदर योजना ही फळ पिकासाठी लागू नसल्यामुळे फळ उत्पादकांना याचा कोणताही लाभ मिळणार नाही, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्याबाबत तसेच यात दोषी विमा कंपन्यांच्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) हे खरे नाही.

खरीप २०२० हंगामात स्थानिक नैसर्गिक आपत्ती मुळे विमाधारक शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले. मात्र कोविड २०१९ ची लाक्षणिक परिस्थितीमध्ये विविध कारणांमुळे काही विमाधारक शेतकरी संबंधित विमा कंपनीस नुकसानीबाबत सूचना देऊ शकले नाहीत. यास्तव पिकांच्या नुकसानीबाबत NDRF मध्ये झालेले पंचनामे गृहीत धरून शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाई देणे बाबत राज्य शासनाने विमा कंपन्यांकडे आग्रही भूमिका ठेवली आहे.

तसेच धाराशिव जिल्हयात NDRF अंतर्गत केलेले पंचनामे गृहीत धरुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्या संदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे जनहित याचिका क्र. ९१/२०२१ व ६४/२०२१ तसेच रिट याचिका ६८५९/२०२१ दाखल करण्यात आली होती. सदर याचिका दिनांक ०६ मे, २०२२ रोजी निकाली काढण्यात आली व धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत आदेशीत केले. यावर बजाज अलायन्झ जनरल इंन्शुरंस कंपनीने मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. मा. सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊन मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या आदेशावरचे आक्षेप फेटाळण्यात आले आणि जिल्हाधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई निश्चिती व वाटप करण्याबाबत आदेशित केले आहे. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी धाराशिव यांचे पर्यवेक्षणाखाली नुकसान भरपाई वाटप करण्यात आले आहे.
(६) हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२० ते रब्बी हंगाम २०२१-२२ अंतर्गत एकूण रक्कम रु. ४६००.६७ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी दिनांक ६.०७.२०२३ अखेर रु.४३२८.९६ कोटी इतकी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपन्यांमार्फत करण्यात आले आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

दिनांक ०६ जुलै, २०२३ अखेर खरीप हंगाम सन २०२२ अंतर्गत एकूण रक्कम रु. ३१८०.३६ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी रु. ३१४१.१९ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपन्यांमार्फत करण्यात आले आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच रब्बी हंगाम २०२२-२३ अंतर्गत एकूण रक्कम रु. २८.०३ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी रु.११.०१ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपन्यांमार्फत करण्यात आले आहे. उर्वरित नुकसान भरपाई निश्चितीची व वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(७) अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित पीकांसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सर्वसमावेशक पिक विमा योजना खरीप हंगाम-२०२३ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. तसेच फळपिकांसाठी निर्धारित हवामान धोक्यानुसार पुर्नरचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे व सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बोगस बियाणांच्या विक्रीवर नियंत्रण आणून बियाणे उद्योगात वाढ करण्याबाबत

**(२०) * ६५०९९ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी कोट्यवधी रुपयांचे बोगस व अप्रमाणित बियाणे बाजारामध्ये विक्रीसाठी आले असून काही ठिकाणी बियाणांची जादा दराने विक्री होत आहे, हे खरे आहे काय,

(२) चिखली (जि.बुलढाणा) येथील एमआयडीसीच्या गोडाऊनमध्ये ग्रीन गोल्ड सीड्स प्रायव्हेट लिमिटेड व राणाजी सीड्स या कंपनीचे बोगस सोयाबीन बियाणे आढळल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी कृषी विभागामार्फत बोगस बियाण्यांचे साठे जप्त करण्यात येत असून कोकण विभागातही भात बियाणांमध्ये भेसळीचे बियाणे उपलब्ध होत असून काही जिल्ह्यात गुणनियंत्रण विभागाचे बियाणे

कंपन्यांशी आर्थिक हितसंबंध असल्यामुळे कृषी गुणनियंत्रण विभाग त्यांच्यावर कोणतीच कारवाई करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील किनवट, माहूर तालुक्याच्या सिमावर्ती भागात विनापरवाना तेलंगणातून बियाणे आणून विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, एकीकडे राज्यात बोगस बियाण्यांची अवैध विक्री होत असतानाच शासन आणि बियाणे कंपनी यामध्ये सहकार्याचा असलेला अभाव, बियाणे उद्योगासाठी १०० कोटी तरतूदीची घोषणा, बियाणे हब संकल्पना कागदावरच राहणे, दळणवळणाच्या गैरसोयी, अन्य राज्यात मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या सवलती इत्यादी कारणांमुळे राज्यातील बियाणे उत्पादकांनी तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात स्थलांतर केल्यामुळे राज्यातील बियाणांचा वाटा ४० टक्क्यांनी घसरल्याचे दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन बोगस बियाणांच्या विक्रीवर आळा घालणे, राज्यात बियाणे उद्योगांची वाढ, इतर राज्यात होणारे स्थलांतर यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यात काही ठिकाणी अप्रमाणित बियाणांची विक्री तसेच जादा दराने बियाणांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. कृषि विभागाने राज्यात बियाणे संदर्भात अनेक ठिकाणी कार्यवाही करत असून १६४ मे.टन साठा जप्त केला आहे. २२ पोलीस केसेस दाखल केल्या आहेत. २० विक्रेत्याचे परवाने रद्द केले आहेत. तसेच १०५ विक्रेत्याचे परवाने निलंबीत करण्यात आलेले आहेत.

कोकण विभागात भात बियाणे भेसळ संदर्भातील कोणतीही बाब आढळून आली नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

राज्यात बियाणे उत्पादन क्षेत्रात वाढीसाठी पोषक वातावरण निर्मिती करण्यासाठी जालना येथील बियाणे उदयोगाकरीता शासनाने जालना सीड पार्क प्रकल्प उभारण्यास मंजुरी दिली आहे. मौजे पानशेंद्रा, जि. जालना येथे जिल्हाधिकारी, जालना यांनी सीड पार्क उभारणीसाठी ७५ एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. जालना सीड पार्क विकसित करण्याच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला नोडल एजन्सी म्हणून काम करीत आहे. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बियाणे उद्योजकांच्या गरजा तसेच नव-उद्योजक शेतकरी, छोटे उद्योजक, शेतकरी उत्पादक कंपन्या यांचेसाठी आवश्यक सुविधा निश्चित करून डीपीआर (Detailed Project Report) तयार करण्यात आलेला आहे. सदर सीड पार्क राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार Techno Feasibility अहवाल तयार करण्यात आलेला असून सदर अहवाल मान्यतेस्तव विचाराधीन आहे.

(६) राज्यात बियाणे कायद्यातील तरतुदीनुसार अप्रमाणित/अनधिकृत बियाणे विक्री संदर्भात कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. तसेच कृषि निविष्ठांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र गुणनियंत्रण यंत्रणा कार्यरत आहे. शेतकऱ्यांना दर्जदार बियाणे मिळण्याकरीता कृषि विभाग सतर्क आहे. बियाणे उद्योगाची वाढ होण्याकरीता सीड पार्क कार्यान्वयीत करण्याचे काम प्रस्तावित आहे. राज्यात सन २०१९ मध्ये ६५४ बियाणे कंपन्या कार्यरत होत्या. सन २०२१ मध्ये आपले सरकार पोर्टलवर महापरवाना प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत १४८० कापूस व इतर बियाणे कंपन्या कार्यरत असून राज्यात नोंदणीकृत बियाणे कंपन्याची वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) येथील कर्नाळा नागरी सहकारी बँक लि. या बँकेतील ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत देण्याबाबत**

**(२१) * ६५२४९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील कर्नाळा नागरी सहकारी बँक मर्या. बँकेतील संचालकांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहारामुळे बहुतांशी खातेदार व ठेवीदारांना अद्यापही त्यांच्या ठेवी परत न मिळाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बँकेतील गैरव्यवहारात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या संचालक व कर्मचाऱ्यांवर संबंधित विभागामार्फत ठोस कारवाई होत नसल्यामुळे खातेदार व ठेवीदारांना त्यांच्या बँकेतील ठेवी मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बँकेतील सामान्य लोकांच्या ठेवी त्यांना परत मिळण्यासाठी तसेच बँकेतील गैरव्यवहारात सहभागी असणाऱ्या संचालक व कर्मचाऱ्यांच्या स्थावर जंगम मालमत्तेचा लिलाव करुन ठेवीदाराला पैसे देण्याबाबत कोणत्या उपाययोजना व कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे पाटील :** (१) होय.

(२) व (३) बँकेतील एकुण ६३ कर्ज प्रकरणात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी बँकेचे तत्कालीन संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्जदार अशा एकुण ६३ जणांवर दिनांक १७.०२.२०२० रोजी गुन्हा क्र.७८/२०२० दाखल करण्यात आला असून त्याबाबतचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग करत आहे.

राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने कर्नाळा बँकेचे अध्यक्ष,उपाध्यक्ष,संचालक,मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित व्यक्ती यांच्या ७० मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंरक्षण अधिनियम १९९९ मधील तरतुदीनुसार जप्त केल्या आहे. बँकेतील गैरव्यवहाराच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी करण्यात आली असून संचालक, अधिकारी/कर्मचारी अशा २० जणांवर रु.५२९.३७ कोटी रकमेची जबाबदारी निश्चित केली असून त्यानुसार वसुली प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे.

कर्नाळा नागरी सहकारी बँक लि. दिनांक १७.०८.२०२१ रोजी अवसायनात घेतली आहे. अवसायन दिनांकास ५१,६२४ ठेवीदारांच्या ५५३.३२ कोटी रकमेच्या ठेवी आहेत. बँकेचा परवाना रद्द झाल्यानंतर डी.आय.सी.जी.सी कडून आजपर्यंत ३८,६३९ ठेवीदारांना रु.३७७.७१ कोटी मंजुर करण्यात आले असून त्यापैकी २३,१२३ ठेवीदारांना रु.३७१.७४ कोटी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित ठेवीदारांच्या ठेवी अदा करण्याची कार्यवाही सूरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोकण विभागातील आंबा बागायतदारांकरिता विशेष पॅकेजची घोषणा करण्याबाबत**

**(२२) * ६४८७७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागात बदलणारे हवामान, अवकाळी पाऊस, श्रीप्स व तुडतूड्या रोगामुळे आंबा बागायतदार अडचणीत सापडला असून यंदा १० टक्केही हापूस आंब्याचे पिक हाती आलेले नसल्यामुळे आंबा उत्पादकांनी त्यांच्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा पिकांचे सर्वेक्षण कृषी विभागामार्फत होणे आवश्यक असून कोकण कृषी विद्यापीठाने माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनास अहवाल देऊनही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील आंबा बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात झालेल्या नुकसानीसंदर्भात विशेष पॅकेजची घोषणा करावी अशी मागणी बागायतदारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आंबा बागायतदारांना दिलासा देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.